# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व विभाग व अधिविभाग प्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की अधिविभागांना विविध वित्तिय संस्थेकडून साहित्य व उपकरणे खरेदीसाठी प्राप्त अनुदानाचा त्या त्या आर्थिक वर्षात दि. 31 मार्च पूर्वी विनियोग करावा लागतो. अशा साहित्य/ उपकरणांची खरेदी करताना संबंधित समित्यांची (फर्निचर / तांत्रिक समिती ) मान्यता, अधिकारप्रदान नियमावलीनुसार प्रशासकीय मान्यता घेऊन करावी लागते. ज्या साहित्य / उपकरणांची किंमत रू. 3 लाखापेक्षा जास्त आहे त्यांची खरेदी निविदा मागवून करावी लागते. निविदा मागवून खरेदी करण्याच्या प्रक्रियेस अंदाजे किमान 5 ते 6 आठवडे लागतात. खरेदी प्रक्रियेस लागणारा अवधी व मार्च, 2021 अखेरचा उपलब्ध वेळ लक्षात घेवून वरील खरेदी प्रक्रिया वेळेत पार पाडण्यासाठी तांत्रिक समिती व प्रशासकीय मान्यता घेवून प्रस्ताव दि. 15 फेब्रुवारी, 2021 अखेर भांडार विभागाकडे पाठविण्यात यावेत. याचबरोबर निविदा प्रसिध्द झाल्यानंतर जास्तीत जास्त निविदा प्राप्त होण्यासाठी संबधित अधिविभागांकडून प्रयत्न व्हावा की जेणे करून पुनःश्च निविदा मागवाव्या लागणार नाहीत व खरेदी प्रकिया पूर्ण करून अनुदानाचा विनियोग वेळीच करता येईल.

वार्षिक दरकरारांतर्गत खरेदी करावयाचे साहित्य/उपकरणे योग्य त्या समितीची शिफारस, प्रशासकीय मान्यतेसहीत आपले प्रस्ताव भांडार विभागाकडे पाठविण्यात यावेत. सदर साहित्य/उपकरण पुरवठा करण्यास लागणाऱ्या 5 ते 06 आठवडे कालावधीचा विचार करता प्रस्ताव वेळेत येणे आवश्यक असून दि. 15 फेब्रुवारी, 2021 नंतर येणाऱ्या खरेदी प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

वित्त व लेखा अधिकारी

शिवाजी वि./भांडार / 593
दि. 08 FEB 2021

प्रत;— 1. सर्व विभाग प्रमुख/ सर्व अधिविभाग प्रमुख/संचालक/ समन्वयक.

2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.

3. मा. कुलगुरू, मा. प्र—कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास.

4. इंटरनेट विभाग — सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या इंट्रानेटवर प्रसिध्द करण्यात यावे.